**सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास उमेदवारांना सहा महिन्यांची मुदत देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - संकिर्ण-२०२४/प्र.क्र. ७५/आरक्षण-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक - ५ सप्टेंबर, २०२४

**संदर्भ-**

शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/ प्र.क्र. ७५/ आरक्षण ५, दिनांक २२.०७.२०२४

**प्रस्तावना -**

संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २२ जुलै, २०२४ अन्वये राज्यात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गासाठी सन २०२४-२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे.

२. इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या उमेदवारांनाही शैक्षणिक प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अडचणी येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) प्रवर्गाप्रमाणेच इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गातील उमेदवारांकरीता सन २०२४-२०२५ या वर्षासाठी शैक्षणिक प्रवेशाकरीता अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय-**

राज्यात सध्या सुरू असलेल्या सन २०२४-२५ या वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या उमेदवारांना सद्य:स्थितीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी लक्षात घेता, राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) सदर प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरीता, प्रवेशासाठी अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी देण्यात येत आहे. सदर सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधित उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द होतील व त्याबाबत संबंधित उमेदवार स्वतः जबाबदार राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०९०५१४५२१४८९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARCHANA J TAMORE

Digitally signed by ARCHANA J TAMORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=b89cc23ba64c2e257250277aa5fbfdc9f82cb978bc5e229e7598bba40a61d487, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=61749DEAF7128E9D69EA5D23C7A15EEA58D13AD6EAF0FA0A656E1BBA62A15BD5, cn=ARCHANA J TAMORE
Date: 2024.09.05 14:52:48 +05'30'

**( अर्चना तामोरे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य/संसद सदस्य
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०)अपर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव, वैद्यकीय शिक्षण वऔषधी द्रव्ये विभाग, जी.टी. हॉस्पिटल, मुंबई.
१६) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८) महालेखापाल, महाराष्ट्र-१. मुंबई.
१९) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुबई
२१) मुख्य महानगर दंडाधिकारी,
२२) सर्व विभागीय आयुक्त.
२३) सर्व जिल्हाधिकारी,
२४) सर्व उप विभागीय दंडाधिकारी (महसूल) तथा उप विभागीय अधिकारी,
२५) सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
२६) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई
२७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, मुंबई.
२८) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ नागपूर.
२९) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, नागपूर,
३०) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
३१) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,

३२) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३३) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

३४) संचालक, विजाभज संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३५) संचालक, उच्च तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३६) संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

३७) संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

३८) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,

३९) सर्व मंत्रालयीन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात,

४०) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण

४१) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

४२) सर्व जिल्हा परिषदाचे समाजकल्याण अधिकारी

४३) सर्व अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती

४४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

४५ निवड नस्ती, आरक्षण-५